# मिरा भाईंदर महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग
जा.क्र.मनपा/सा.प्र./९६७/२०१५.
दि.२८/०४/२०१५.

## ।। परिपत्रक ।।

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात नगरसेवक स्वेच्छा निधी, प्रभाग समिती निधी, महापौर स्वेच्छा निधी, उप-महापौर स्वेच्छा निधी, सभापती, स्थायी समिती स्वेच्छा निधी या लेखाशिर्षात तरतूद करण्यात येते. यापैकी नगरसेवक निधी हा संबंधित नगरसेवकाच्या स्वेच्छा निर्णयानुसार त्यांचे प्रभागातील, शासनाने निश्चित केलेल्या विविध कामांसाठी वापरला जातो. परंतु माझ्या असे निदर्शनास आले आहे की, काही सन्माननीय नगरसेवकांचा स्वेच्छा निधी अन्य प्रभागामध्ये वापरण्याबाबत विनंती केली जाते. ही बाब प्रशासकीय दृष्ट्या चुकीची असुन कायदेशीर तरतुदीचा भंग करणारी आहे.

सबब, याबाबत धोरण निश्चित करण्याची बाब प्रशासनाच्या विचाराधीन होती. त्यामुळे पदाधिकाऱ्यांचा निधी वापरणे बाबत खालीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

१) सन्माननीय पदाधिकारी/नगरसेवक यांचा निधी वापरताना शासनाने निर्देशित केलेल्या कामकाजाच्या यादीपैकीच कामे प्रस्तावित केलेली असावीत.

२) नगरसेवक स्वेच्छा निधी हा संबंधित नगरसेवकाच्या स्वतःच्या निर्वाचन प्रभागामध्येच वापरणे बंधनकारक राहील.

३) स्विकृत नगरसेवकांना, त्यांचा स्वेच्छा निधी ज्या प्रभागात वापरावयाचा आहे, त्या प्रभागातील निवडून आलेल्या नगरसेवकांचे लेखी संमती पत्र प्राप्त करणे आवश्यक राहील.

४) प्रभाग समिती निधी वापरताना, संबंधित प्रभाग समितीच्या अधिनस्त असलेल्या प्रभागांमध्येच सदर निधी वापरावा लागेल. तसेच संबंधित प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रातील ज्या प्रभागामध्ये सदर निधी वापरावयाचा आहे, त्या प्रभागातून निवडून आलेल्या नगरसेवकाची लेखी संमती घेणे बंधनकारक राहील.

५) महापौर स्वेच्छा निधी, उप-महापौर स्वेच्छा निधी व स्थायी समिती (सभापती) स्वेच्छा निधी, हा ज्या वॉर्डात वापरावयाचा आहे त्या वॉर्डातील निवडून आलेल्या नगरसेवकांची लेखी संमती घेणे बंधनकारक राहील.

वरील आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत:-

१. अतिरिक्त आयुक्त
२. उपायुक्त (सर्व)
३. मुख्य लेखा परीक्षक
४. शहर अभियंता
५. कार्यकारी अभियंता (बांधकाम)
६. कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा)
७. खातेप्रमुख/कार्यालयप्रमुख (सर्व)

Scanned with CamScanner